दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | शुक्रवार दि.६ फेब्रुवारी २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक १६२ | पाने ४ | किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi | Friday 6 Feburary 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 162 | Pages 4 | Rate 4 Rs

## काँग्रेसमधला कलह दिल्लीत मिटला

**मुंबई–** अखेर चंद्रपूर काँग्रेसमधील विधिमंडळ नेते आणि आमदार विजय वडेट्टीवार आणि खासदार प्रतिभा धानोरकर यांच्यातील अंतर्गत कलह दिल्ली दरबारी मिटल्याचे समोर आले आहे. त्यानुसार चंद्रपूर महापालिकेचे महापौरपद धानोरकर गटाकडे, तर उपमहापौरपदी वडेट्टीवारांच्या समर्थकाची वर्णी लागणार आहे. या ठिकाणी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेलाही सत्तेत वाटा मिळणार आहे.गेले काही दिवस चंद्रपूर महापालिकेतील काँग्रेस बाबत संभ्रमाचे वातावरण होते. त्यात आमदार विजय वडेट्टीवार आणि खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या अंतर्गत वाद सुरू होता. मात्र, दिल्लीत काँग्रेस पक्षश्रेष्ठींशी चर्चा केल्यानंतर अखेरीस आज त्यावर तोडगा निघाला.चंद्रपूर वादावर विजय वडेट्टीवार यांनी पत्रकार परिषद घेतली. ते म्हणाले की, 'महाराष्ट्र काँग्रेस आणि दिल्लीतून घेण्यात आलेल्या निर्णयानुसार खासदार प्रतिभा धानोरकर आणि गटनेता राजेश अरुण म्हणतील तो महापौर होईल.

# लाडक्या बहिणींना मोठा दिलासा
# थकीत ४५०० रुपये एकाचवेळी खात्यात
## ई–केवायसी अडचणीतून सुटका; सरकारचा आर्थिक दिलासा

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील महिलांसाठी राबविण्यात येत असलेल्या लाडकी बहीण योजनेतील लाभार्थींना मोठा दिलासा देणारी माहिती महिला व बालविकास विभागाकडून समोर आली आहे. ई–केवायसी प्रक्रियेमुळे अनेक महिलांचे थकीत राहिलेले तीन महिन्यांचे हप्ते आता एकत्रित स्वरूपात देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यामुळे नोव्हेंबर, डिसेंबर आणि जानेवारी या तीन महिन्यांचा एकूण ४५०० रुपयांचा हप्ता पात्र महिलांच्या बँक खात्यात थेट जमा होणार आहे. या निर्णयामुळे गेल्या काही महिन्यांपासून पैसे न मिळाल्याने त्रस्त झालेल्या महिलांना मोठा दिलासा मिळणार आहे.विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुरू करण्यात आलेल्या या योजनेत राज्यातील महिलांना दरमहा १५०० रुपयांची आर्थिक मदत थेट त्यांच्या बँक खात्यात जमा केली जाते. या योजनेचा मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाला असून, महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाच्या दृष्टीने हा महत्त्वाचा उपक्रम मानला जातो. निवडणुकीत या योजनेचा महायुती सरकारला राजकीय लाभ झाल्याचेही चित्र दिसून आले. मात्र, ई–केवायसी प्रक्रियेमुळे अनेक लाभार्थींना नियोजित वेळेत हप्ते मिळाले नाहीत, त्यामुळे नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते.

ई–केवायसी पूर्ण न झाल्यामुळे अनेक महिलांचे हप्ते थांबले होते. काही महिलांनी आवश्यक कागदपत्रे आणि प्रक्रिया पूर्ण करूनही त्यांच्या खात्यात पैसे जमा झाले नव्हते. त्यामुळे महिलांनी संबंधित कार्यालयांमध्ये जाऊन नाराजी व्यक्त केली. काही ठिकाणी तर लाभार्थी महिला रस्त्यावर उतरून आंदोलन करतानाही दिसून आल्या. पैसे का येत नाहीत, याबाबत स्पष्टता नसल्याने महिलांमध्ये संभ्रम आणि असंतोष वाढत होता.या पार्श्वभूमीवर महिला व बालकल्याण विभागाने संबंधित अधिकाऱ्यांना लाभार्थी महिलांच्या घरी जाऊन चौकशी करण्याचे आदेश दिले होते. नियम आणि अटी डावलून सादर झालेल्या अर्जांची पडताळणी सध्या सुरू आहे. यामुळे लाभार्थींची माहिती तपासून योग्य पात्र महिलांपर्यंत लाभ पोहोचवण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून केला जात आहे. या सर्व प्रक्रियेनंतर आता थकीत हप्ते एकत्र देण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला आहे.या निर्णयानुसार पात्र लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात थेट ४५०० रुपये जमा केले जाणार आहेत. ज्यांचे नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्यांचे हप्ते थकले होते, त्यांना जानेवारीसह एकत्रित रक्कम दिली जाईल. तर काही महिलांना यापूर्वीच दोन महिन्यांचे हप्ते मिळाले असल्यास, त्यांना जानेवारी महिन्याचा एकच हप्ता देण्यात येणार आहे. या संदर्भातील वृत्त एका मराठी वृत्तसंस्थेने प्रसिद्ध केले आहे.या निर्णयामुळे लाभार्थी महिलांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण होण्याची शक्यता आहे. गेल्या काही महिन्यांपासून पैसे न मिळाल्याने निर्माण झालेला तणाव कमी होणार असून, महिलांना त्यांच्या दैनंदिन गरजा भागवण्यासाठी आर्थिक मदत वेळेत मिळणार आहे. सरकारने घेतलेल्या या निर्णयामुळे प्रशासन आणि लाभार्थी यांच्यातील दरी कमी होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.




### मासिक हप्ता १५०० रुपयांवरून २१०० रुपये करण्याची शक्यता

**दरम्यान, निवडणुकीदरम्यान दिलेल्या आश्वासनानुसार भविष्यात या योजनेतील मासिक हप्ता १५०० रुपयांवरून २१०० रुपये करण्याची शक्यता देखील वर्तवली जात आहे. मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि उदय सामंत यांनी जिल्हा परिषद निवडणुकीच्या प्रचारावेळी यासंदर्भात संकेत दिले होते. हा निर्णय प्रत्यक्षात आल्यास राज्यातील लाखो महिलांना अधिक आर्थिक आधार मिळेल आणि लाडकी बहीण योजना अधिक प्रभावी ठरेल, अशी चर्चा सध्या राजकीय वर्तुळात सुरू आहे.**

# विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी शाळांमध्ये स्नेहसंमेलन झाली पाहिजेत-पंडित
## अहिल्यादेवी होळकर विद्यालयात स्नेहसंमेलन संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**गेवराई । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण, वकृत्व गुण आणि शिस्त वाढवण्यासाठी प्रत्येक शाळेत स्नेहसंमेलन झाली पाहिजेत. कारण या स्नेहसंमेलनामध्ये विविध क्रीडा स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रम होत असल्याने विद्यार्थ्यांच्या कलागुणांना योग्य पद्धतीचा वाव मिळतो. क्रीडा आणि सांस्कृतिक उपक्रमांसह विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे लक्ष देऊन आपले भविष्यातील ध्येय निश्चित करून त्या मार्गाने वाटचाल करावी. शिक्षणाशिवाय भविष्यात पर्याय नाही असे सांगून, माहिती तंत्रज्ञानाकडेही विद्यार्थ्यांनी लक्ष देण्याची गरज असल्याचे प्रतिपादन भाजपा युवा नेते यशराज पंडित यांनी केले आहे. शोभादेवी महिला सेवाभावी संस्था संचलित अहिल्याबाई होळकर विद्यालय खांडवी येथे दिनांक ४ फेब्रुवारी २०२६ रोजी वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न झाले याप्रसंगी ते कार्यक्रमाध्यक्ष म्हणून म्हणून




बोलत होते. या स्नेहसंमेलनात शालेय मुला मुलींनी विविध गीतांवर बहारदार नृत्य सादर केली. गीत गायन आणि नाटिका यामधून बालकलावंतांनी सर्व प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. शाळेचे मुख्याध्यापक केशव तळेकर यांनी आपल्या प्रास्ताविकात, यावर्षी शाळेमध्ये शैक्षणिक सहल क्रीडा महोत्सव, आनंदनगरी आदींसह विविध उपक्रम घेण्यात आल्याचे सांगून स्नेहसंमेलन यातून विद्यार्थ्यांच्या अंगीकृत कलागुणांना वाव देण्याचा प्रयत्न केला असल्याचे म्हटले. याप्रसंगी शिक्षण विस्तार अधिकारी नांदुरकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक सतीश काटकर, केंद्रप्रमुख अण्णासाहेब लोणकर, प्रशासकीय अधिकारी प्रमोद देसले, कैलास शिंदे, लहू भोले, अनिल थोरात, सचिन आडे, दादाराव नाईकवाडे, प्रकाश भोले, रामा गांजले, सचिन भोले, महेंद्र भोले, शेख नूर, शेजुळ आदींची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमास महिला व पुरुष गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते सर्वांनी विविध कार्यक्रमांना टाळ्या वाजवून साथ देत बालकलावंतांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किसन बांगर यांनी केले.

# केजमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रीमियर लीगचा दिमाखदार सोहळा संपन्न
### दहा संघांमध्ये रंगणार क्रिकेटचा थरार; मान्यवरांच्या उपस्थितीत चौथ्या वर्षाचे थाटात उद्घाटन

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील क्रिकेट प्रेमींसाठी पर्वणी ठरलेली डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रीमियर लीग (–झङ) वर्ष ४ थे चा शानदार उद्घाटन सोहळा गुरुवार,दि.५ फेब्रुवारी २०२६ रोजी स्व. अजित दादा पवार स्टेडियम (पंचायत समिती केज) येथे उत्साहात पार पडला.आयपीएलच्या धर्तीवर खेळवल्या जाणाऱ्या या स्पर्धेत यंदा १० कसलेल्या संघांनी सहभाग नोंदवला असून, केजकरांना पुढील काही दिवस क्रिकेटची मेजवानी मिळणार आहे.

**मान्यवरांची उपस्थिती आणि उद्घाटन**

या स्पर्धेचे उद्घाटन बाळराजे आवारे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटनेते हारुणभाई इनामदार, नगराध्यक्षा सौ.सितताई बनसोड,युवा नेते राहुल भैय्या गदळे,सरपंच अमोल भैय्या डोईफोडे, व्यंकट हजारे आणि समिर पाशा (पोलीस) यांची प्रमुख उपस्थिती होती.मान्यवरांनी आपल्या मनोगतातून



खेळाडूंना शुभेच्छा देत, अशा क्रीडा स्पर्धांमुळे शहरातील तरुण कौशल्याला वाव मिळत असल्याचे प्रतिपादन केले.

**ज्येष्ठ खेळाडूंचा यथोचित सन्मान**

मैदानावर घाम गाळणाऱ्या आणि क्रिकेटमध्ये योगदान देणाऱ्या जेष्ठ खेळाडूंचा यावेळी विशेष सत्कार करण्यात आला.यामध्ये प्रामुख्याने अकबर इनामदार,प्रकाश मुंडे,बंडू मस्के,शेख जफर,फस्सी मौजन,प्रशांत जाधव,प्रेमजीत हजारे,पाशा शेख आणि इतर खेळाडूंचा समावेश होता.

**आयोजनाचा थाट आणि चुरस**

लखन हजारे (बहुजन विकास मोर्चा) व ब्लू स्टार ग्रुप यांच्या वतीने या स्पर्धेचे नेटके नियोजन करण्यात आले आहे. लखन हजारे,मुन्ना शिंदे, जहीर हाफी साहेब,प्रविण मस्के आणि प्रितम साळवे यांच्या अथक परिश्रमातून ही स्पर्धा साकारली जात आहे.या स्पर्धेचे स्वरूप व्यावसायिक असून, प्रत्येक सामना अटी तटीचा होणार आहे.

शहरातील तरुणांना एक हक्काचे व्यासपीठमिळावे आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना खेळाच्या माध्यमातून अभिवादन करावे,या उद्देशाने या लीगचे आयोजन करण्यात आले आहे.–हारुणभाई इनामदार गटनेते,केज दहा संघांच्या या लढतीत विजेतेपद कोण पटकावणार,याकडे आता संपूर्ण केज शहराचे लक्ष लागले आहे.

## प्लॉट खरेदीसाठी माहेर हून १० लाख रुपये आणण्याच्या मागणीसाठी विवाहितेचा छळ पती, सासू,सासरे यांच्यासह सात जणांविरुद्ध केज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील नाव्होली येथील एका विवाहितेला प्लॉट खरेदी साठी माहेरहून १० लाख रुपये आणण्याची मागणी करत सासरच्यांनी शारीरिक व मानसिक छळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी पती,सासू,सासरे यांच्यासह एकूण सात जणांविरुद्ध केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की,केज तालुक्या तील सारूळ येथील पुनम हिचा विवाह नाव्होली येथील जयदत्त बिक्कड यांच्याशी सन २०२२ मध्ये झाला.विवाहानंतर काही काळ सासरकडील मंडळींनी नीट वागणूक दिली.मात्र ३१ ऑक्टोबर २०२२ ते २५ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत पत्नीच्या इच्छेविरुद्ध वारंवार जबरदस्तीने अनैसर्गिक शारीरिक संबंध ठेवले,असा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.तसेच सासरच्या मंडळींनी




संगनमत करून फ्लॅट/प्लॉट खरेदीसाठी माहेरहून १० लाख रुपये आणण्याची सतत मागणी केली.यासाठी नाव्होली व पुणे येथे मारहाण, शिवीगाळ करून शारीरिक व मानसिक छळ करण्यात आला. तुला मुलबाळ होऊ देणार नाहीअसे म्हणत जीवे मारण्याची धमकीही दिल्याचा आरोप आहे.

या प्रकरणी फिर्यादी पुनम जयदत्त बिक्कड (वय २६,रा.नाव्होली,मूळ रा. सारूळ)यांच्या तक्रारी वरून पती जयदत्त बाबासाहेब बिक्कड, सासरे बाबासाहेब देविदास बिक्कड,सासू गवळणबाई बाबासाहेब बिक्कड (रा.नाव्होली,ता. केज,जि.बीड),नणंद दिपाली बाबासाहेब ढाकणे व नंदावे बाबासाहेब विठ्ठल ढाकणे (रा.उपळाई,ता.कळंब), तसेच नणंद ज्योती संतोष तांदळे व नंदावे संतोष रावसाहेब तांदळे (रा. धोंडराई,ता.गेवराई) अशा सात जणांविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पिंक पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक प्रकाश शेळके करीत आहेत.

# चिमुकल्याची भाजी मंडई



दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

५/०२/२०२६ आज रोजी नूतन ज्ञान मंदिर कल्याण(पूर्व) च्या प्रांगणामध्ये, पूर्व प्राथमिक विभागातील चिमुकल्यांची भाजीपाला मंडई हा अत्यंत आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे या सर्व पार्श्वभूमीवर पडला ही चिमुकल्यांची भाजी मंडई पाहताना

श्रश्र कांदा मुळा भाजी अवघी विठाई माझी
श्रश्र लसूण मिरची कोथिंबीर अवघा झाला माझा हरी

या संत सावता महाराज यांच्या अभंग आठवतो. पालकांसोबत भाजी मंडईत भाजी विकणारी मुलं हे विठ्ठलाचे रूप भासतात या भाजी मंडईत विविध प्रकारच्या फळभाज्या, पालेभाज्या तसेच कडधान्य यांची विक्री केली जात होती. पूर्व प्राथमिक विभागाची निरागस चिमुकली आपल्याला आज या सर्व भाजी विकताना दिसत होती. त्यांच्याबरोबर त्यांचे पालकही होते. भाजी तर विकतच होते त्याचं सोबत पैसेही व्यवस्थित ठेवत होते.

तसेच या सर्व पूर्व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ भाग्यश्री जोशी सांगतात की विद्यार्थ्यांनाही आई डब्यात जी भाजी देते ती भाजी कशी दिसते?ती कशा प्रकारे बाजारातून आणली जाते? या सर्व भाजी मंडई कशी असते? याचा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांना देण्यासाठी चिमुकल्यांची भाजी मंडई हा उपक्रम शाळेमध्ये घेतला काही चिमुकल्यांनी आपल्या पालकांसोबत भाजी विक्री केली तर काही चिमुकल्यांनी आपल्या पालकांसोबत भाजी खरेदी ही केली. या उपक्रमास पालकांचा उदंड असा प्रतिसाद लाभला तसेच नूतन ज्ञान मंदिर शाळेतील शिक्षकांनी सुद्धा या चिमुकल्यांच्या भाजी मंडईतून भाजी खरेदी केली या चिमुकल्याच्या भाजी मंडईला आकार दिला तो पूर्व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ भाग्यश्री जोशी तसेच त्यांच्या सहशिक्षिका सौ समिधा कदम, सौ दिपाली पवार, सौ ज्योती महाजन, सौ नंदा जोशी, सौ शितल सोनावळे ,व सौ सुजाता कारंडे या सहशिक्षकांनी.कोणत्याही शाळेत न जाणाऱ्या संतांनी आपली मराठी भाषा जिवंत ठेवली आणि याच मराठी भाषेला आपणही जिवंत ठेवण्यासाठी आपल्या मराठी माध्यमाच्या शाळा वाचवणे गरजेचे आहे अशा प्रकारचे शाळेत उपक्रम राबवून आपली मराठी शाळाआपले मराठीपण जिवंत ठेवत आहे.आशा आपल्या पूर्व प्राथमिक विभागाच्या शिक्षिका.

# संपादकीय

## गेमचेंजर करार

भारत आणि युरोपीय महासंघामध्ये खुला व्यापार करार झाल्यानंतर अमेरिकेला चांगल्याच मिरच्या झोंबल्या. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प एकामागून एका देशाला अतिरिक्त कर लादत आहेत. भारतावरही त्यांनी पन्नास टक्के आयात शुल्क लादले. म्हणूनच भारताने जगातील अनेक देशांबरोबर करार करण्यासाठी वेगवान पावले उचलली. म्हणूनच हा 'गेमचेंजर' करार अमेरिका, चीनसारख्या देशांना खुपणे स्वाभाविक आहे.भारत–युरोपीय महासंघातील मुक्त व्यापार करार हा दोन अब्ज लोकांच्या बाजारपेठेसाठी आतापर्यंतचा सर्वात महत्त्वाकांक्षी करार आहे. या कराराला 'मदर ऑफ ऑल डील्स' म्हटले जात आहे. भारतासोबतच्या मुक्त व्यापार करारांतर्गत युरोपीय महासंघाने दिलेल्या आयात शुल्क सवलतींमुळे२७ राष्ट्रांच्या गटाला होणारी देशाची निर्यात वाढून देशांतर्गत उत्पादन वाढेल. २०२४–२५ या आर्थिक वर्षात भारताचा युरोपीय महासंघाचा द्विपक्षीय वस्तूंचा व्यापार १३६.५३ अब्ज डॉलर्सचा होता. त्यात ७५.८५ अब्ज डॉलर्सची निर्यात आणि ६०.६८ अब्ज डॉलर्सची आयात होती. यामुळे युरोपीय महासंघ भारताचा सर्वात मोठा वस्तू–व्यापार भागीदार बनला आहे. भारताच्या एकूण निर्यातीपैकी युरोपीय महासंघ बाजारपेठेचा वाटा अंदाजे १७ टक्के आहे, तर भारतात युरोपीय महासंघाची निर्यात भारताच्या एकूण परदेशी आयातीपैकी नऊ टक्के आहे. हा करार पुढील वर्षाच्या सुरुवातीला लागू होण्याची अपेक्षा आहे. युरोपीय महासंघ हा जगातील सर्वात मोठा आयातदार आहे. 'कराराची जननी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या करारामुळे भारताला महत्त्वपूर्ण फायदे मिळण्याची अपेक्षा आहे. भारतातील जवळजवळ सर्व निर्यात वस्तू २७ युरोपीय देशांमध्ये शून्य किंवा अत्यंत कमी कर दराने प्रवेश करतील. देशातील कृषी उत्पादक, सेवा पुरवठादार आणि औषधनिर्माण आणि कापड उत्पादन क्षेत्रातील कंपन्यांना याचा फायदा होईल. यामुळे मोठ्या प्रमाणात नोकऱ्या निर्माण होण्याची अपेक्षा आहे. तथापि, हा करार अमेरिका आणि चीनच्या आर्थिक गतिमानतेसाठी एक नवीन आव्हान निर्माण करू शकतो.अमेरिकेने भारतावर अतिरिक्त शुल्क आणि चीनने संवेदनशील वस्तूंवर निर्यात निर्बंध लादून निर्माण केलेला दबाव या करारामुळे निरर्थक ठरण्याची शक्यता आहे. ताज्या करारामुळे स्थिर लोकसंख्या असलेल्या युरोपीय देशांना मोठी बाजारपेठ मिळेल. या करारामुळे युरोपीय संघालाही लक्षणीय फायदा होण्याची अपेक्षा आहे. युरोपीय देश सध्या उच्च महागाई आणि आर्थिक मंदीचा सामना करत आहेत. लोकसंख्या वाढीमध्ये लक्षणीय घट झाल्यामुळे तेथे वस्तूंचा वापर थांबत आहे. या परिस्थितीत युरोपीय कंपन्यांना १.४ अब्ज लोकसंख्या असलेला भारतासारखा देश मित्र म्हणून समोर आला आहे. तो त्यांच्या वस्तूंसाठी एक प्रमुख केंद्र बनू शकतो. यामुळे संपूर्ण युरोपची आर्थिक परिस्थिती मजबूत होईल. इटली आणि फ्रान्ससारखे देश महागड्या वाइन उत्पादनासाठी जगप्रसिद्ध आहेत. आतापर्यंत भारतात या वाइनच्या विक्रीवर शंभर टक्के किंवा त्याहून अधिक कर आकारला जात होता. तथापि, करारानंतर हे दर सुमारे दहा टक्क्यांपर्यंत कमी केले जाऊ शकतात. यामुळे भारतातील परदेशी वाइनची विक्री आणि युरोपचा नफा वाढू शकतो. परिणामी, भारतीय वाइनप्रेमींना परवडणाऱ्या किमतीत उच्च दर्जाच्या परदेशी वाइन उपलब्ध होतील.भारतात महागड्या परदेशी वाहनांच्या खरेदीदारांचा मोठा ग्राहकवर्ग आहे. मात्र युरोपीय बनावटीच्या कार खरेदी करण्यासाठी जादा कर लागतात. ते बहुतेकदा वाहनांच्या किमतीइतकेच असतात. त्यामुळे नोंदणी प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर वाहनाची खरेदी किंमत दुप्पट होते. तथापि, आता भारत–युरोपीय व्यापार करारानंतर हे कर लक्षणीयरीत्या कमी होण्याची अपेक्षा आहे. यामुळे युरोपीय देशांना भारतात उच्च दर्जाच्या कार विकण्याची संधी मिळेल आणि भारतातील नवश्रीमंतांना परवडणाऱ्या किमतीत उच्च दर्जाच्या कार मिळू शकतील. भारतात स्वस्त कामगार उपलब्ध होतील, रोजगार वाढेल. अमेरिकेने देशात काम करणाऱ्या परदेशी नागरिकांसाठी व्हिसा नियम कडक केले आहेत. आज अमेरिका परदेशी नागरिकांना नोकरी देण्यापासून रोखत असल्याचे दिसून येते. तथापि, युरोपीयन अर्थव्यवस्था सेवा क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. ती त्यांच्या एकूण जीडीपीमध्ये ७० टक्के योगदान देते. परिणामी, युरोपीयन सेवा कंपन्यांना भारतात परवडणारे, कुशल कामगार उपलब्ध होतील. यामुळे भारत आणि युरोप या दोघांनाही लक्षणीय फायदे मिळण्याची शक्यता आहे. आतापर्यंत अमेरिका भारताला रशियाकडून तेल खरेदी करण्यापासून रोखण्यासाठी उच्च शुल्क लादत होती. ही रणनीती काम करत असल्याचे दिसून येते. कारण रिलायन्ससह अनेक भारतीय कंपन्यांनी रशियाकडून तेल खरेदी लक्षणीयरीत्या कमी केली आहे. ट्रम्प युरोपलाही अशाच प्रकारच्या धमक्या देत आहेत. मात्र ताज्या कराराबाबत नाराजी दाखवणारी अमेरिका हा खेळ आपल्या हातून निसटताना पाहत आहे.अमेरिका आपल्या अर्थव्यवस्थेच्या बळावर युरोपीय देशांना धमकावण्याचा प्रयत्न करत होती; परंतु युरोपला भारतात मोठी आणि परवडणारी बाजारपेठ मिळाल्याने अमेरिकेला आपले डावपेच अपयशी ठरताना दिसत आहेत. ट्रम्प प्रशासनातील ट्रेझरी सेक्रेटरी स्कॉट बेसंट यांनी याला 'युरोपने अमेरिकेशी केलेला विश्वासघात' म्हटले आहे. त्यांनी म्हटले आहे, की या करारात सामील होऊन युरोप स्वतःविरुद्ध लढल्या जाणाऱ्या युद्धाला अप्रत्यक्षपणे वित्तपुरवठा करत आहे. अमेरिका रशियन तेल खरेदी करण्यापासून रोखण्यासाठी युरोपीय देशांवरही शुल्क लादण्याबद्दल बोलत होती. तथापि, युरोपला भारतात मोठी बाजारपेठ मिळाल्याने या शुल्काचे महत्त्व जवळजवळ संपुष्टात येऊ शकते. या करारामुळे भारतातील सर्वात असुरक्षित आणि 'एमएसएमई' क्षेत्राला फायदा होण्याची शक्यता आहे. भारत अजूनही अमेरिका आणि युरोपला तयार कृषी उत्पादने, कपडे आणि औषधे निर्यात करतो. देशातील सर्वात असुरक्षित किंवा मध्यमवर्ग कपडे आणि कृषी उत्पादनांमध्ये काम करत असल्याने युरोपीय देशांसोबत वाढलेल्या व्यापाराचा या वर्गाला थेट फायदा होण्याची शक्यता आहे. यामुळे या क्षेत्रांमध्ये रोजगारनिर्मिती वाढण्याची शक्यता आहे. युरोपीय संघ आणि भारत यांच्यातील या करारावर अमेरिका खूश नाही. त्यांनी भारत आणि युरोपीय महासंघाला 'देशद्रोही'ही म्हटले होते, तर रशियाकडून तेल आयातीसाठी भारतावर अतिरिक्त २५ टक्के कर लादला होता. भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार करार अद्याप अंतिम झालेला नाही, तर युरोपीय महासंघात करार अंतिम झाला आहे.भारतीय निर्यातदारांना २७ युरोपीय देशांमध्ये अंदाजे ४५० दशलक्ष उच्च–उत्पन्न ग्राहकांना शून्य दरात किंवा अत्यंत कमी दराने प्राधान्याने प्रवेश मिळेल. युरोपीय महासंघ सध्या १२५ अब्ज डॉलर्स किमतीचे कापड आणि वस्त्रोद्योग आयात करते. यामध्ये भारताचा वाटा फक्त पाच ते सहा टक्के आहे. दुसरीकडे, चीनचा बाजारहिस्सा तीस टक्के असून बांगलादेश आणि पाकिस्तानचा एकत्रित बाजार वीस टक्के आहे. बांगलादेश आणि पाकिस्तानला युरोपीय महासंघाकडून शून्य कर आकारणीचा फायदा होतो. खुल्या व्यापार करारामुळे भारत या देशांच्या करसमानतेत येईल. परिणामी, अमेरिकेच्या ५० टक्के कर आकारणीमुळे तोटा सहन करणाऱ्या भारतीय कापड उद्योगाला आपली उत्पादने विकण्यासाठी नवी बाजारपेठ मिळेल. पादत्राणे, चामड्याच्या वस्तू, रत्ने आणि दागिने यासारख्या क्षेत्रांच्या निर्यातीत लक्षणीय वाढ दिसून येईल. भारतीय औषध कंपन्यांसाठी केवळ कर कपातीतच मुख्य फायदा नाही, तर नियामक अडथळे कमी करणे आणि मानकांची परस्परमान्यता याचादेखील फायदा आहे.

# मुंबई–पुणे महामार्गावर वाहतूक कोंडी:एकनाथ शिंदेंकडून गंभीर दखल

## विशेष आपत्कालीन वाहतूक आराखडा तयार करण्याचे दिले आदेश

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**

मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर बोरघाटात गॅस टँकरच्या अपघातामुळे मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होऊन वाहन चालकांना झालेल्या त्रासाची गंभीर दखल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतली असून या पुढील काळात अशा घटनांची पुनरावृत्ती होणार नाही यासाठी विशेष आपत्कालीन वाहतूक आराखडा मुंबई–पुणे द्रुतगती महामार्गासाठी तयार करण्याचे निर्देश एमएसआरडीसी त्याचप्रमाणे पोलिसांना दिले आहेत.गॅस टँकर उलटल्यामुळे ज्वलनशील प्रोपोलीन गॅसची गळती सुरू झाली होती. या गळतीमुळे धोका आणखी वाढून मोठे नुकसान झाले असते त्यामुळे वाहतुकीचे नियोजन करण्याशिवाय पर्यायच नव्हता. त्यामुळे द्रुतगती महामार्गावरील वाहतूक जुन्या महामार्गाकडे वळवावी लागली. शिवाय एमएसआरडीसी आणि पोलिसांनी अथक २० तास प्रयत्न करून गॅस गळती सुद्धा रोखली आहे असे सांगून उपमुख्यमंत्री म्हणतात की, प्रवाशांना झालेला त्रास दुर्दैवी आहे. त्यांना झालेल्या मनस्तापाची पूर्ण कल्पना आहे. पण एमएसआरडीसीने सुद्धा तातडीने राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाची कुमक मागवली. त्यांनीही प्रयत्न केले. मात्र हे काम खूप आव्हानात्मक होते.पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, या दुर्घटनेत जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. त्यामुळे भारत पेट्रोलियम हिंदुस्तान पेट्रोलियम आणि रिलायन्स कंपनीच्या तज्ञांना बोलवण्यात आलं. या पथकांनी गॅस गळतीवर नियंत्रण मिळवलं.दरम्यान प्रवाशांना एमएसआरडीसी कडून मोठ्या प्रमाणावर पिण्याचे पाणी, बिस्किट्स देण्यात आले. सर्व अधिकारी कर्मचारी रस्त्यावर होते. एवढेच नाही तर पथकर वसुली करू नये म्हणून देखील निर्देश मी दिले असल्याचे एकनाथ शिंदे यांनी सांगितले. वाहतूक व्यवस्था पूर्वपदावर येईपर्यंत या महामार्गावरील टोल वसूली थांबविण्याचे निर्देशही उपमुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.मुंबई पुणे मिसिंग लिंकचे काम अंतिम टप्प्यात असून ते तातडीने पूर्ण करून हा टप्पा लवकरात लवकर सुरू करण्याचे निर्देशही एकनाथ शिंदे यांनी विभागाला दिले. ही लिंक सुरू झाल्यानंतर मुंबई–पुणे प्रवासातील अंतरही वाचेल त्याचप्रमाणे अशा घटना घडल्यास पर्यायी वाहतुकीचा मार्गही कामाला येईल, असे सांगून शिंदे यांनी एमएसआरडीसी त्याचप्रमाणे पोलीस अधिकाऱ्यांशी विस्तृत चर्चाही केली आणि एक आपत्कालीन आराखडा तयार करण्यास सांगितले.




# दिव्यात एकाची आत्महत्या तर दुसऱ्या घटनेत पतिकडून पत्नीची हत्या

## दिवा पोलीस स्टेशन तात्काळ सुरु करण्याची मागणी

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**

दिव्यात बेडेकर नगर येथे खरवलीआई चाळ येथे सुशांत यादव (वय ३९) असे आत्महत्या केलेल्या व्यक्तीचे नाव आहे. यादव यांनी अज्ञात कारणातून राहत्या घरी गळफास घेत आत्महत्या केली. घरात कोणीही नसल्याची संधी साधत सुशांत यादव यांनी सिलिंग फॅनला ओढणीने गळफास घेत आत्महत्या केली. सुशांत विवाहित असून ते एका राजकीय पक्षात सक्रिय कार्यकर्ते होते. दरम्यान काल संध्याकाळच्या सुमारास पत्नी घरी आली असता त्याना सुशांत गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसून आला. त्यांनी तातडीने याबाबत दिवा पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेहाचा पंचनामा करुन उत्तरीय तपासणीसाठी कळव्यातील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात पाठवला. यादव यांच्या पश्चात पत्नी, आई वडील, भाऊ असा परिवार आहे. तर दुसऱ्या घटनेत दिवा स्टेशन ते सदाशिव दळवीनगर रस्त्यावरील रुही अपार्टमेंट मध्ये दुसऱ्या मजल्यावर राहणारे पती पत्नी यांचे आपआपसात कौटुंबिक वादातून झालेल्या भांडणातून पतीने धारदार



हत्याराने वार करून पत्नीची हत्या केली असून प्रकरणी आरोपी पतीला दिवा पोलिसांनी ताब्यात घेतले असून पुढील तपासाचीचक्रे फिरविण्यात आली असून सदर हत्या प्रकरणी आज ठाणे फॉरनसिक टीम घटनास्थळी दाखल झाली असून पुढील तपास सुरु असून मृत महिलेला पुढील कारवाईसाठी कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात पाठवले आहे. सदर महिला हत्या याप्रकरणी अधिक तपास मुंब्रा पोलीस स्टेशन अंतर्गत दिवा पोलीस चौकीचे सहायक पोलीस निरीक्षक सोनावणे अधिक तपास करत आहेत. दिव्यात वाढती लोकसंख्या व वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर दिवा पोलीस स्टेशन तात्काळ सुरु करण्याची मागणी पुन्हा जोर धरू लागली आहे.

# महाविकास आघाडीवर मनसेच्या पदाधिकारी–कार्यकर्त्यांची नाराजी

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**

आगामी होऊ घातलेल्या जिल्हा परिषदेच्या व पंचायत समितीच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीचे नेते आम्हाला विश्वासात न घेता ते जर का जाणून बुजून आम्हाला टाळत असतील तर हा आमच्या मनसेच्या पदाधिकाऱ्यांचा व कार्यकर्त्यांचा अपमान आहे. त्यामुळे महाविकास आघाडी सोबत आमचा काहीही संबंध नाही. भविष्यात जो पक्ष आम्हाला संधी देईल. त्याच पक्षाला आम्ही या निवडणुकीत मदत करणार असल्याची माहिती मनसेचे जिल्हाध्यक्ष संदेश ठाकूर व उरण तालुकाध्यक्ष सत्यवान भगत यांनी मंगळवारी (दि.३) आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत दिली. पक्षीय राजकारण बाजूला ठेवून एका विशिष्ट उद्दिष्टासाठी आम्हाला हा निर्णय घेणे हिताचे वाटते. त्यासाठी प्रसंगी भाजपसोबत जरी जावे लागले तरी आम्ही त्यांना पाठिंबा देऊ असेही संदेश ठाकूर व सत्यवान भगत व यांनी सांगितले.

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका येत्या ७ फेब्रुवारीला पार पडणार आहेत. या निवडणुकीच्या प्रचाराला सुरुवात झाली असून, प्रचारात रंगत आली आहे. प्रचारही जवळजवळ अंतिम टप्प्यात आला आहे. मात्र महाविकास आघाडीचे नेते, कार्यकर्ते आम्हाला प्रचारात सहभागी करून घेत नाहीत. किंवा महत्त्वाच्या सभा, बैठकांनाही बोलवत नाहीत. त्यामुळे येथील मनसेच्या



कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड नाराजी निर्माण झाली असून, महाविकास आघाडी ताकद दाखविण्यासाठी आमच्या मनसेच्या पक्षाचे झेंडे, चिन्ह, फोटो प्रचारात वापरत असल्यामुळे, मनसेचे कार्यकर्ते संतापले आहेत.प्रसार माध्यमांच्या माध्यमातून आमची भूमिका मांडण्यासाठी हे आम्ही पाऊल उचलले असून आमचा त्यांच्याशी या निवडणुकीत कोणताही संबंध नाही. त्यासाठी हि तातडीने पत्रकार परिषद घेतली असून, बातमीच्या माध्यमातून हा मेसेज त्यांच्यापर्यंत नक्कीच पोहोचेल. महाविकास आघाडी आम्हाला विश्वासात घेत नाही. यासाठी आम्ही त्यांच्या पक्षाच्या वरिष्ठांशी मोबाईलद्वारे वेळोवेळी संपर्क साधला. मात्र संपर्क करत असताना संपर्क झालाच नाही. असेही त्यांनी स्पष्ट केले. ज्या महाविकास आघाडीच्या लोकांकडून आमच्या अपेक्षा होत्या. त्या पूर्ण झाल्या नसून आमचा भ्रमनिरास झाला आहे. आम्हाला जर सोबत घेऊन प्रचाराचे काम करत नसाल तर आमच्या पक्षाचे प्रचारात झेंडे, चिन्ह, फोटो वापरण्याचा अधिकार तुम्हाला नाही. यासाठी आम्ही त्यांच्या वरिष्ठांना लेखी पत्र व्यवहार करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे देखील भगत यांनी सांगितले. घटक पक्ष म्हणून आम्ही तुमच्या पाठीशी होतो. परंतु तुम्हाला आमची गरजच भासत नसेल तर आम्ही तुम्हाला का मदत करायची? आवरे पंचायत गणातून मनसेतून आम्ही सुषमा अनिल गावंड यांना उमेदवारी दिली आहे. त्यासाठी आवरे गणात आम्ही जोरदार प्रचारही सुरू केला आहे. तिरंगी लढत होऊन आमचा विजय कसा होईल. हे आम्ही दाखवून देणार आहोत. तालुक्यात ग्रामपंचायतींमध्ये आमचे पाच ते सात सदस्य निवडून आले आहेत. त्यापैकी काहींना उपसरपंच पदे मिळाली आहेत. त्यामुळे तालुक्यात आमची ताकद आहे. भविष्यात आम्हाला यापेक्षा जास्त जागा जिंकायच्या आहेत. त्यामुळे आमच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या भावना आम्हाला दुखवायच्या नाहीत. त्या जपायला हव्यात. त्यासाठी हा निर्णय घेतला आहे. मनसे ज्या पक्षाच्या सोबत जाईल तिथे आम्ही किंग मेकर राहणार आहोत. असेही भगत यांनी सांगितले. पत्रकार परिषदेला मनसेच्या उमेदवार सुषमा गावंड यांचे पती अनिल गावंड उपस्थित होते.

# उरणला महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अस्थिकलशाचे पूजन

## शोकसभेला सर्वपक्षीय नेत्यांची हजेरी, अजितदादा यांना वाहिली श्रद्धांजली, अजितदादांच्या आठवणीला दिला उजाळा

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**

सर्वसामान्य जनतेशी नाळ जोडलेला लोकनेता हरपला असल्याच्या भावना काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस महेंद्र ठाकूर यांनी व्यक्त केल्या. महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे नुकतेच मुंबईहून बारामतीकडे जाताना बारामती येथे विमान अपघातात दुःखद निधन झाले आहे. या घटनेने महाराष्ट्रसह देशभर शोक व्यक्त केला जात असताना, उरण राष्ट्रवादी काँग्रेस तर्फे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे(अजित पवार गट) उरण तालुका अध्यक्ष परिक्षित ठाकूर यांच्या वतीने उरण येथील आनंदी हॉटेलमध्ये अस्थिकलश पूजन व शोक सभेचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी वेळी महेंद्र ठाकूर हे आपल्या शोक भावना व्यक्त करताना बोलत होते. यावेळी अस्थि कलशाचे पूजन करून, माणकेश्वर येथील समुद्रात अस्थींचे विसर्जन करण्यात आले. यापुढे बोलताना महेंद्र ठाकूर यांनी दादांच्या स्पष्ट वक्तेपणामुळे प्रशासनावर त्यांची पकड होती. दादांच्या जाण्याने कधीही न भरून निघणारी संपूर्ण महाराष्ट्राची हानी झाली



आहे. असे सांगितले. तर राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते संतोष ठाकूर यांनी राजकारणातील धुरंदर लोकाभिमुख नेतृत्व महाराष्ट्रने गमावले आहे. दादा हे दादाच होते. दादांच्या विशेष योगदानामुळे ते नेहमीच सर्वांच्या स्मरणात राहतील.अशा संतोष ठाकूर यांनी शोक भावना व्यक्त केल्या.युवा नेते तेजस डाकी यांनी आपल्या भावना व्यक्त करताना अजितदादा यांच्या आठवणीना उजाळा दिला. अजितदादा सारखे नेते पुन्हा होणार नाही दादा एक आदर्श राजकारणी होते असे मत व्यक्त केले. यावेळी उपस्थित परीक्षित ठाकूर यांनीही अजितदादा यांच्या अनेक आठवणी सांगितल्या अजितदादा यांची काम करण्याची पद्धत आदर्श होती. कोणतेही काम लगेच करायचे. दादांचे कार्य सर्वांना कायम लक्षात राहिल. अजितदादा सर्वांच्या हृदयात राहतील अजितदादा यांच्या जाण्याने राज्याचे, पक्षाचे व व्यक्तिशः माझेही नुकसान झाले आहे. अजितदादा यांची उणीव नेहमी भासत राहिल. अजितदादा यांच्या जाण्याने देशाचे खूप मोठे नुकसान झाले आहे. त्यांना भावपुर्ण श्रद्धांजली अर्पण करतो असे मत परीक्षित ठाकूर यांनी व्यक्त केले.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अनेक नेत्यांबरोबर इतर पक्षाच्या कार्यकर्त्यांनी एक स्पष्ट व निर्भीड व्यक्तिमत्व आपल्यातून हरपल्याच्या भावना व्यक्त केल्या. याप्रसंगी काँग्रेसचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे उरण तालुका अध्यक्ष परीक्षित ठाकूर, उपनगराध्यक्ष रवि भोईर, राष्ट्रवादी काँग्रेसचे उपाध्यक्ष समाधान म्हात्रे, राजिप माजी सदस्य वैजनाथ ठाकूर, राजिप माजी सदस्या कुंदा ठाकूर, राजिप माजी सदस्य विजय भोईर,आदर्श शेतकरी प्रकाश ठाकूर,ज्येष्ठ पत्रकार प्रवीण पुरो, पंचायत समितीचे माजी सदस्य दीपक ठाकूर, माजी सरपंच जितेंद्र घरत, प्रकाश ठाकूर,सीमा घरत, अँड भार्गव पाटील, मनोज भगत, चिंतामण गायकवाड, युवा नेते तेजस डाकी, रमाकांत म्हात्रे, नरेश घरत यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेससह सर्वपक्षीय नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.यावेळी उपस्थितांनी अजित दादांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहून त्यांच्या आत्म्यास चिरशांतीसाठी प्रार्थना केली.राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने उरण तालुका अध्यक्ष परीक्षित ठाकूर यांनी अस्थी कलश पूजन व शोक सभेचे आयोजन केले होते. अत्यंत शोकाकुल वातावरणात शोक सभा संपन्न झाली.

# दिवा खर्डी येथील ओम बंगल्यात गॅस सिलेंडर ला लागलेल्या आगीत घरसामान जळून खाक

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**

दिनांक ०४/०२/२०२६ रोजी दुपारी ३ वाजताच्या सुमारास आशापुरा मेडिकल मागे, खर्डी गाव, दिवा (पू.) ठाणे या ठिकाणी ओम बंगला (मालक – श्री.गणेश भोईर) मध्ये भारत गॅस सिलेंडरला आग लागली होती. सदर घटनास्थळी अग्निशमन दलाचे जवान ०१– फायर वाहन व १–रेस्क्यू वाहनासह तसेच टोरंट पॉवर कंपनीचे कर्मचारी उपस्थित होते. सदर घटनास्थळी कोणालाही दुखापत नाही. सदर घटनास्थळी आग लागल्याने किचनमधील साहित्य, फ्रिज, इलेक्ट्रिक वायरिंग, गॅस सिलेंडर इत्यादी जळून नुकसान झाले आहे.सदर घटनास्थळी किचनमध्ये लागलेली आग अग्निशमन दलाच्या जवानांकडून १५:३० वाजताच्या सुमारास पूर्णपणे विझविण्यात आली असून, परिस्थिती नियंत्रणात आहे.



# पंजाबमधील महिला सरपंचांनी केला चालुक्य कालीन येरगीचा अभ्यास दौरा

## ग्रामस्थांच्या स्वागताने महिला सरपंच झाले भावुक

दैनिक वादळ वार्ता

**देगलूर | प्रतिनिधी**

: पंजाबमधील महिला सरपंचांनी तालुक्यातील चालुक्य काळातील येरगी गावास भेट दिली आणि तेथील ऐतिहासिक वारसा आणि प्राचीन स्थापत्य कलेची माहिती घेतली. येरगी येथे आल्यावर ग्रामपंचायत,बालिका पंचायत राज,विद्यार्थ्यांचे लेझीम पथक आणि ग्रामस्थांनी केलेल्या स्वागताने पंजाबमधील सर्व महिला सरपंच व अधिकारी भारावून गेले . येरगी स्थापत्य कलेचा व विकासाचा अभ्यास करण्यासाठी पंजाब सरकारने त्यांना यशदा पुणे मार्फत पाठवले होते.





*बालिका पंचायत राज च्या वतीने स्वागत

पंजाबच्या सर्व महिला सरपंच व पदाधिकारी हे गावात आल्यावर सर्वप्रथम त्यांच्या प्रमुखांच्या हस्ते सरस्वती प्रतिमेचे पूजन करण्यात आले

यानंतर बालिका पंचायत राज समितीच्या वतीने भव्य स्वागत करण्यात आले. याप्रसंगी गावातील शालेय विद्यार्थ्यांच्या लेझीम पथकाने संगीतमय लेझीम नृत्य सादर करून त्यांचे स्वागत केले.

यावेळी सरपंच श्रीमती संगीता पाटील मठवाले, गटविकास अधिकारी श्रीकांत बळदे ,
सरपंच प्रतिनिधी संतोष पाटील,विस्तार अधिकारी बालाजी उमाटे, दत्तात्रेय कुरुंदे,ग्राम पंचायत अधिकारी राजेश तोटावाड
सर्व ग्राम पंचायत सदस्य व गावकरी उपस्थित होते.

***गावाच्या प्रवेशद्वारावर फुलांच्या पाकळ्यांनी स्वागत**

शुक्रवारी, पंजाबच्या महिला सरपंच सकाळी ११.३० वाजता गावात दाखल झाल्या. येरगी बालिका पंचायत आणि गावातील शेकडो महिलांनी गावाच्या प्रवेशद्वारावर सर्व पाहुण्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान केला. तसेच, बालिका पंचायत ने व गावातील महिलांनी त्यांच्यावर गुलाब आणि इतर फुलांच्या पाकळ्यांची पुष्पवृष्टी केली . या स्वागताने संपूर्ण पाहुणे भारावून गेले होते.

*पाहुण्यांच्या हस्ते एक पेड माँ के नाम अभियान अंतर्गत गावात वृक्षारोपण

येरगी मध्ये एक पेड माँ के नाम अभियान अंतर्गत चालू असलेले वृक्षारोपण अभियानाची माहिती देऊन रस्त्याच्या दुतर्फा पंजाब च्या महिला सरपंचांच्या हस्ते रोपे लावली.यावेळी बालिका पंचायत च्या पदाधिकाऱ्यांनी गावात चालू असलेल्या वृक्षारोपण चळवळीची माहिती सांगितली.

*ग्राम सचिवालयात कार्यक्रमाचे आयोजन

सर्व पाहुण्यांचे वाजत गाजत,लेझीम पथकाच्या नृत्याने गावात मिरवणुकीची सांगता झाल्यावर ग्राम सचिवालयाच्या सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जिथे ग्रामपंचायतीने सर्व पाहुण्यांचे स्वागत केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच श्रीमती संगीता पाटील मठवाले होते. याप्रसंगी गटविकास अधिकारी श्रीकांत बळदे, यशदा पुणे येथील राजू वानखेडे, संतोष पाटील, सहाय्यक गटविकास अधिकारी दत्तात्रय कुरुंदे ,विस्तार अधिकारी बालाजी उमाटे,ग्रामपंचायत अधिकारी राजेश तोटावाड, इत्यादी उपस्थित होते.

यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाषण गटविकास अधिकारी श्रीकांत बळदे यांनी केले आणि सरपंच प्रतिनिधी संतोष पाटील यांनी गावाची ऐतिहासिक माहिती दिली. ज्यामध्ये ११ व्या शतकातील चालुक्य राजवंशाच्या शासकाचे येरगी निवासस्थान असल्याची माहिती तसेच गावात असलेले प्राचीन स्थापत्य कलेचे अद्भुत ऐतिहासिक वारसा, शिलालेख, केशवेश्वर मंदिर, सरस्वती मंदिर इत्यादींची माहिती देण्यात आली.

यावेळी बालिका पंचायत ची सचिव महादेवी दाणेवार यांनी बालिका पंचायत द्वारे गावात राबवत असलेल्या विविध योजनांची माहिती दिली. गावातील मुलींच्या सुरक्षेसाठी सरपंच संतोष पाटील यांच्याकडून राबविण्यात आलेल्या कराटे प्रशिक्षण,योग-प्राणायाम,बालविवाह बंदी,गावातील मुली शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून करत असलेले प्रयत्न आदींची माहिती दिली.

**पीपीटीद्वारे दिली गाव विकासाची माहिती**

ग्राम सचिवालयात झालेल्या कार्यक्रमानंतर, पाहुण्यांना गावाची शाळा दाखवण्यात आली जिथे पीपीटीने आजपर्यंत ग्रामपंचायतीने गावात केलेल्या कामांची माहिती दिली. वरील माहितीने सर्व पाहुणे प्रभावित झाले आणि पंजाबला गेल्यानंतर त्यांनी पंजाबमध्ये येथील विशेष मोहिम राबविण्याचा संकल्प केला.

बालिका पंचायतीने दर रविवारी राबविण्यात येणारे स्वच्छता,अभियान, बालविवाह प्रतिबंध , दारू आणि हुंडाबंदीच्या निर्णयाचे कौतुक केले.

बालिका पंचायत राजने गावात चालवलेल्या विविध मोहिमांची माहिती घेतल्यानंतर, दारूबंदी, हुंडाबंदी, मुलींचे शिक्षण, बालविवाह बंदी इत्यादींबाबत त्यांच्याकडून चालवल्या जाणाऱ्या मोहिमांचे कौतुक केले. आणि सर्व महिला सरपंचांनी बालिका पंचायतीला पंजाबला येण्याचे आमंत्रण दिले. अवघ्या तासातच बालिका पंचायत व अन्य महिला पंजाबच्या महिला सरपंचा सोबत मिसळल्या आणि त्यांच्यासोबत सेल्फी काढण्याचा मोह आवरला नाही.

**पंजाबच्या सरपंचांनी गावातील स्वच्छतेचे केले कौतुक**

पीपीटीची माहिती घेतल्यानंतर सर्व पाहुण्यांनी गावात फेरफटका मारली. त्यांना चालुक्य काळातील सर्व मंदिरे आणि गावात असलेल्या त्यांच्या कलाकृतींची माहिती दिली . गावात भेट देताना त्यांनी गावात दिसणाऱ्या स्वच्छतेचे कौतुक केले आणि गावात दर रविवारी होणाऱ्या स्वच्छता मोहिमेची माहिती घेतली. त्यांना गावात असलेल्या चालुक्य काळातील १८ विहिरी आणि २ बारवांची माहिती मिळाली आणि चालुक्य काळातील पाणीपुरवठा योजनेच्या अद्भुत स्थापत्यकलेमुळे प्रभावित झाले. तसेच, या प्राचीन विहिरींमधील पाणी पिऊन त्यांनी ते अतिशय गोड असल्याचे सांगितले.

पंजाबमधील महिला सरपंचांनी सकाळी ११.३० ते सायंकाळी ४.३० पर्यंत वेळ दिला आणि गावातील महिलांमध्ये मिसळल्या आणि येरगीहून निघताना त्यांचे डोळे अश्रूंनी भरले होते. त्यांनी सांगितले की आजपर्यंत आम्हाला इतरत्र कुठेही असे प्रेम,आदर मिळाला नाही.कार्यक्रम सुरळीत पार पाडण्यासाठी मरखेल पोलिस स्टेशन चे सहायक पोलिस निरीक्षक आर. एम. हुंडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. तसेच आरोग्य विभाग, महावितरण कर्मचारी, कृषी विभाग, तहसील कार्यालय, शाळेतील शिक्षक आणि महिला शिक्षिका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संतोष पाटील, ग्रामपंचायत अधिकारी राजेश तोटावाड,सर्व ग्राम पंचायत सदस्य ,शालेय शिक्षण समितीचे सर्व पदाधिकारी,बालिका पंचायत चे सर्व पदाधिकारी,शाळेतील शिक्षकवृंद आणि सर्व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

# रामेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या कोट्यावधी रुपयांच्या घोटाळ्याची चौकशी होणे गरजेचे!

दैनिक वादळ वार्ता

**भोकरदन | प्रतिनिधी**

आवश्यक माहिती देण्याबाबत कारखाना प्रशासनाला दिले पत्र!आवश्यक माहिती न दिल्यास चौकशीसाठी वरिष्ठाकडे धाव घेणार!सविस्तर असे की,माझ्यासह अनेक शेतकरी रामेश्वर सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक सदस्य आहेत. मोठ्या उम्मेदीने शेतकऱ्यांनी एकत्र येऊन हा कारखाना उभा केला. त्यात माझ्यासह अनेक शेतकऱ्यांनी सहकारी सोसायटीचे कर्ज घेऊन कारखान्याचे शेअर्स घेतले व सभासद झाले. त्यानंतर त्या सहकारी सोसायटीचे कर्ज संबंधित शेतकऱ्यांना भरावेच लागले. सुरुवातीला सर्व कारभार व्यवस्थित होता पत्रव्यवहार ही केला जात होता. सर्वसाधारण सभेच्या सूचना आणि निवडणुक कार्यक्रमा बाबत माहिती प्राप्त होत होती. परंतु काही लोकांना मतदार यादीतून वगळण्यात आले. तर पत्र व्यवहार ही बंद झाला. सर्वसाधारण सभेची सूचना सुद्धा दिली जात नाही. कारखान्याच्या कामकाजा बाबत कोणत्याही कार्यवाही मध्ये सर्वसाधारण सभा असो की निवडणूक कार्यक्रम असो भाग घेण्यापासून हेतुपुरस्पर वंचीत ठेवण्यात येत आहे.त्यामुळे कारखाना नफ्यात का तोट्यात हे समजायला मार्ग नाही. तर कारखाना तोट्यात दाखवून केंद्र शासनाकडून राज्य शासनाकडून लाटलेल्या अनुदानाची काय झाले याचा हिशोब दिला जात नाही. काही लोकांचा कारखान्याच्या जमिनीवर आणि मालमत्तेवर डोळा आहे.परंतु त्यांचे हे मनसुबे भविष्यात हानुन पाडले जातील.कामकाजा बाबत अनेक संस्थापक सदस्यांची त्याबाबत नाराजी आहे. त्यामुळे लवकरच सामुहिक सभा घेऊन पुढील दिशा ठरवली जाणार आहे. प्रायव्हेट प्रॉपर्टी प्रमाणे कारखान्याचा कारभार चालू असून आर्थिक घोटाळ्याची चौकशी होणे आवश्यक आहे. कारखाना प्रशासनासोबत पत्रव्यवहार करण्यात आला असून आवश्यक माहिती मागविण्यात आलेली आहे प्रशासन सकारात्मक प्रतिसाद देईल अशी आशा असून सर्वांचे ऐकून घेतले जाईल ही अपेक्षा आहे. परंतु सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्यास संघर्षाशिवाय पर्याय राहणार नाही.संघर्षासाठी आता शेतकरी तय्यार आहेत.



**के. व्ही.बोरशे (बोरशे गुरुजी )**
**९४०३५००४७७**
**राहणार करजगांव**
**तालुका भोकरदन जिल्हा जालना.**

# इंदिरा आवास नगर येथील अवैध रित्या विक्री होत असलेल्या शिंदी व दारु तात्काळ बंद करा



दैनिक वादळ वार्ता

**देगलूर | प्रतिनिधी**

देगलूर तालुक्यातील मौजे खानापुर ता देगलुर येथिल इंदिरा आवास नगर येथे सद्या बेकायदेशिर व बिनापरवानगी शिंदी व दारु विक्री केली जात असलेले रसायन मिश्रीत शिंदी सध्या जोमात विक्री केली जात आहे. त्यामुळे इंदिरा आवास येथील नांगरीकांचे जिव धोक्यात आले आहे. तसेच इंदिरा आवासमध्ये बेकायदेशिर व अवैधरित्या दारुची विक्री केली जात आहे. त्यामध्ये अव्याच्या सव्वा भावाने दारु विकणे तसेच या दारुमुळे अनेकांचे संसार उघडयावर आले तरुण मंडळी दारू शिंदे च्या आहारी जाऊन बर्बाद होत आहेत नसेत आपण कोणतेही कृत्य करित आहोत याचे भान राहात नसल्यामुळे युवा पिढी नष्ट होत आहे दारु व शिंदी सेवन केल्यामुळे अनेक परिवार उघडयावर यऊन कौटुंबिक हिंसाचारासारखे प्रकार वाढले आहेत. याच अवैद्य शिंदी व दारुच्या विक्रीतेमुळे सामाजिक सलोखा नष्ट होऊन दररोजच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे. असे आशयाचे निवेदन राज उत्पादन शुल्क विभाग देगलूर व उपजिल्हाधिकारी देगलूर यांना निवेदन देऊन निवेदन करते नागेश यलपा पलपवार व समस्त इंदिरा आवास नगर येथील नगरवासी यांनी निवेदनावर स्वाक्षरी करून दिले आहे निवेदनाचा तात्काळ चौकशी करून संबंधितावर कारवाई करण्यात यावे अन्यथा इंदिरा आवास नगर येथील अबाल वृद्ध नागरिकांकडून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा गंभीर इशारा दिला आहे

# गोपाळचावडी येथील विश्वशांती महायज्ञ सोहळ्याच्या तयारीची आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांनी पाहणी केली

दैनिक वादळ वार्ता

**नांदेड | प्रतिनिधी**

नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील श्री गुरू दशमुख आश्रम, भीमाशंकरनगर, गोपाळचावडी, नवीन नांदेड येथे दिनांक ५ फेब्रुवारी ते १२ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत विश्वशांती महायज्ञ तसेच श्री केदारनाथ रावळ जगदुरू पाटाभिषेक रजत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या ठिकाणी केदारनाथ मंदिराचा भव्य देखावा साकारण्यात आला असून, कार्यक्रमाच्या तयारीचा आढावा आज आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांनी घेतला.दिनांक ५ ते १२ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत गोपाळचावडी येथे १०८ महायज्ञांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच येथील वीज व पाणीपुरवठ्याबाबत जिल्हा परिषद व नगरपालिका अधिकाऱ्यांना तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना आमदार बोंढारकर यांनी दिल्या आहेत..याशिवाय, कार्यक्रमाच्या अनुषंगाने आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेस उपस्थित राहून पत्रकारांना कार्यक्रमाची सविस्तर माहिती दिली व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांनी केले.



# महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील कर्मचाऱ्यांचा राज्यव्यापी बेमुदत लढा; 'चला मुंबई'चा नारा

दैनिक वादळ वार्ता

**खुलताबाद | प्रतिनिधी**

खुलताबाद महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) अंतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्रभर राज्यव्यापी बेमुदत आंदोलनाला सुरुवात करण्यात आली आहे. चला मुंबईचा निर्धार करत मनरेगा कर्मचाऱ्यांनी टप्प्याटप्प्याने तीव्र आंदोलनाचा कार्यक्रम जाहीर केला असून, मागण्या पूर्ण होईपर्यंत आंदोलन मागे न घेण्याचा ठाम इशारा देण्यात आला आहे.

मनरेगा अंतर्गत कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना इतर शासकीय योजनांतील कर्मचाऱ्यांप्रमाणे शासन सेवेत नियमित/समायोजित करण्यात यावे, ही प्रमुख मागणी आंदोलनाच्या केंद्रस्थानी आहे. अनेक वर्षांपासून मनरेगामध्ये कार्यरत असूनही कर्मचाऱ्यांना अस्थिर रोजगार, अपुरी सेवा-सुरक्षा व अनिश्चित भवितव्याचा सामना करावा लागत असल्याने शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी जोरदार मागणी करण्यात येत आहे.

यासोबतच मनरेगा अंतर्गत ड-२ खपर्षीशलह कंपनीमार्फत सुरू असलेली अनधिकृत व अवैध भरती प्रक्रिया तात्काळ थांबवावी तसेच सदर कंपनी रद्द करून सर्व कर्मचाऱ्यांना 'राज्य निधी असोसिएशन (सोसायटी)'मार्फत नियुक्ती द्यावी, अशी स्पष्ट भूमिका आंदोलकांनी मांडली आहे. समान काम, समान वेतन हे धोरण लागू करून कर्मचाऱ्यांवरील अन्याय दूर करावा, अशीही ठाम मागणी करण्यात आली आहे.

इतर शासकीय विभागांप्रमाणे मनरेगा विभागासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करून पदनिहाय आकृतिबंध (कॅडर स्ट्रक्चर) निश्चित करण्यात यावा, यासाठीही कर्मचाऱ्यांचा आग्रह आहे. सध्या असलेली कंत्राटी व अस्थायी व्यवस्था मनरेगा योजनेच्या कार्यक्षमतेवर परिणाम करत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे.

आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात २३ जानेवारी ते २७ जानेवारी दरम्यान कार्यालयीन कामकाजावर काळ्या पट्ट्या लावून निषेध नोंदविण्यात येणार आहे. त्यानंतर २७ जानेवारी ते १ फेब्रुवारी या कालावधीत कामबंद व असहकार आंदोलन राबविले जाणार आहे. पुढील टप्प्यात २ फेब्रुवारी ते ४ फेब्रुवारी दरम्यान मुंबईतील आझाद मैदानात ठिय्या आंदोलन करण्यात येणार असून, ६ फेब्रुवारी ते १० फेब्रुवारी या काळात साखळी उपोषणाद्वारे आंदोलन अधिक तीव्र केले जाणार आहे.

या सर्व टप्प्यांनंतरही शासनाने मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास ११ फेब्रुवारीपासून बेमुदत आंदोलन, आमरण उपोषण व अन्नत्याग आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा मनरेगा कर्मचाऱ्यांनी दिला आहे. राज्यभरातील जिल्हा चखड समन्वयक, कार्यक्रम व्यवस्थापक, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी, तांत्रिक सहाय्यक, डेटा एंट्री ऑपरेटर व वाहनचालक संघटनांनी या आंदोलनात सक्रिय सहभाग नोंदवला आहे.

मनरेगा योजनेच्या अंमलबजावणीत कणा असलेल्या कर्मचाऱ्यांच्या मागण्या शासनाने गांभीर्याने घ्याव्यात, अन्यथा योजनेच्या कामकाजावर मोठा परिणाम होईल, असा इशाराही आंदोलनकर्त्यांकडून देण्यात आला आहे. आता शासन या राज्यव्यापी आंदोलनाची दखल घेते का, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

**पाठींबा :**

महाराष्ट्र विकास सेवा राजपत्रित अधिकारी संघटनेचा पाठींबा खासदार श्री निलेश लंके, अहिल्यानगर
खासदार श्री संजय जाधव, परभणी.



# जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा चिंचोली माळी येथे वार्षिक स्नेह संमेलन उत्साहात संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा चिंचोली माळी येथे वार्षिक स्नेह संमेलन दि. ४ फेब्रुवारी रोजी मंगळवारी रात्री ६ ते ११ वाजण्याच्या दरम्यान घेण्यात आला.या कार्यक्रमाची सुरुवात माता सवित्री आणि जिजाऊच्या प्रतिमेचे पूजन गावच्या प्रथम नागरिक सौ.रोहीणीताई सुनिल देशमुख सरपंच चिंचोली माळी यांच्या हस्ते करून श्री गणेश वंदना या गिताने सुरुवात करण्यात आली.शाळेत यापुर्वी लहान चिमुकल्यां चा असा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला नव्हता त्यामुळे गावातील सर्वच नागरिक विद्यार्थांचे पालक,महिला व जेष्ठ नागरिक तरुण वर्ग अत्यंत उत्साहात व आनंदाने गावातील भावी पिढी घडवण्याच्या प्रेरणेने सर्वच जण एकत्रित येऊन हा कार्यक्रम घेण्यासाठी शाळेतील सर्वच शिक्षक यांनीआपल्या विद्यार्थ्यांना खुपच उत्कृष्ट आणि कमी कालावधीत त्यांच्या अंगी असलेल्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून असा दर्जेदार कार्यक्रम आयोजित करण्यातआला होता त्यामुळे शाळेला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते.प्रत्येक पालक एकमेकास उत्साहाने आपल्या पाल्याला बदल बोलत असताना शाळेचे कौतुक करत होता या कार्यक्रमात देशभक्ती गीते देवीचे गिते,लावणी,लोक गीते एकापेक्षा एक बहारदार गाण्यावर चिमुकल्यांनी देदिप्यमान नृत्य सादर केले.रात्री उशिरा पर्यंत कार्यक्रम संपन्न झाला.तोपर्यंत गावातील सर्वच माता भगिणी तरुण वर्ग यावेळी उपस्थित होता.या कार्यक्रमास गावातील सर्व राजकीय क्षेत्रातील प्रमुख गटतट विसरून चिमुकल्यांच्या नृत्यांचा आस्वाद घेऊन बक्षिसांचा वर्षाव करत होते.मराठी माध्यम व उर्दु माध्यम शाळेतील सर्वच शिक्षक एकदिलाने कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी साठी परिश्रम घेत होते.या कार्यक्रमासाठी गावातील जेष्ठ भाजपा नेते सुनिल आबा गलांडे,सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन अरुण काळे, राम मेजर राऊत,माजी सरपंच सुनिल देशमुख, माजी उपसरपंच जितेंद्र देशमुख,पवन पवार, शिवसंग्रामचे नेते बाळा साहेब गलांडे,ग्राम पंचायत सदस्य अशोक शिंदे,रामभाऊ गलांडे, बालाजी राऊत,अजिज शेख सर्वच ग्राम पंचायत सदस्य व सेवा सहकारी सोसायटीचे सदस्य त्याच बरोबर गुलाब पठाण, विठ्ठल झाडे,अमर घोडके, पत्रकार संतोष गालफाडे, कर्मवीरविद्यालय चिंचोली माळीचे मुख्याध्यापक व सर्वच स्टाफ त्याच बरोबर शिक्षणप्रेमी नागरिक दगडु दळवी,दिलीप गायकवाड, राजेगाव शाळेचे मुख्याध्यापक शिनगारे सर,प्राथमिक शाळेचे माजी मुख्याधापक भांगे सर,सातव मॅडम,वर्षा माळी मॅडम व संस्कार इंग्लीश स्कूलचे अध्यक्ष अनिल गलांडे व शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष व सर्व सदस्य हा कार्यकम संपेपर्यंत उपस्थितीत होते त्यामुळे हा कार्यक्रम तालुका पातळी पेक्षाही मोठा आणि उत्साहात पार पडला.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक संजयजी गलांडे,जेष्ठ सहशिक्षीका सुरेखाताई पिसे,वानखेडे मडम, मनिषा सोनवणे मॅडम, शेख मॅडम,बाराते मॅडम, नाईकवाडे सर,घुले सर, अमोल राऊत सर, मुज्जमील शेख यांनी व आंगणवाडीताई यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्या साठी परिश्रम घेतले व या कार्यक्रमाचे सुत्र संचालन अमोल राऊत सर व वानखेडे मैडम यांनी केले. कार्यक्रमासाठी परिश्रम घेतल्याचे व सर्व पालक व शिक्षकाचे राम मेजर राऊत यांनी भरभरून कौतुक केले.विशेष सहकार्य म्हणून साऊंड सिस्टिम,लाईट सिस्टिम स्टेज सर्वच सेवा मोफत देऊन लक्ष्मण गलांडे यांनी मोलाचे सहकार्य केले व धनंजय शिंदे यांनी बैठक व्यवस्था केली या दोघांचे ही आभार व्यक्त केले.अशा प्रकारे न भुतो न भविष्यती असा उत्कृष्ट कार्यक्रम संपन्न झाला.



# स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल मध्ये वार्षिक स्नेह संमेलन उत्साहात संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**




केज येथे दि.३ फेब्रुवारी २०२६ मंगळवार रोजी स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल मध्ये वार्षिक स्नेह संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाचे उद्घाटक श्री. बनसोडे साहेब पोलीस उप निरीक्षक केज व कार्यक्रमाचे अध्यक्ष जीवन विकास शिक्षण मंडळाचे सचिव श्री.जी.बी.गदळे सर यांच्या हस्ते संपन्न झाले. या कार्यकमाला प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे अध्यक्ष श्री.अंकुशराव अण्णा इंगळे,नारायण राव अंधारे,श्रीमती शैलजाताई इंगळे,पालक प्रतिनिधी श्री.अशोक सोनवणे,श्री.नारायण
देवा लोंढे यांची उपस्थिती होती.या प्रमुख पाहुण्यांचे स्वागत शाळेचे मुख्याध्यापक श्री.गणेश कोकिळ सर,श्री.विनोद गुंड सर यांनी केले.या कार्यक्रमाला मार्गदर्शन करताना श्री.जी.बी.गदळे सर यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रातील करिअरची व अभ्यासाची महिती दिली. कार्यक्रमाचे उद्घाटक श्री. बनसोडे साहेब यांनी विद्यार्थी मधील विविध कलागुणांसाठी शुभेच्छा दिल्या.या वार्षिक स्नेह संमेलनामध्ये विद्यार्थीनी मराठी गीत,लावणी, नाटक,गोंधळ व हिंदी गाण्यावर नृत्य सादर करून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी प्रतिनिधी कु.अथर्व गवळी,कु.देवयानी इंगळे, कु.हर्षदा नेहरकर,कु. समृध्दी गायकवाड व सौ. कल्याणकर मॅडम यांनी केले.या कार्यक्रमासाठी श्री.कदम सर,श्री.मैंद सर, श्री.तांदळे सर , सौ.काळे मॅडम, सौ.नाईकवाडे मॅडम, सौ.विटेकर मॅडम, सौ.लोखंडे मॅडम, सौ. काळे मॅडम,थोरात मॅडम, सौ.ठोंबरे मॅडम, सौ. कापसे मॅडम,सौ. स्वंराजली मॅडम,सौ. सावंत मॅडम,सौ.राऊत मॅडम,सौ.जाधव मॅडम, महाजन मॅडम,शिक्षक व शिक्षका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी या कार्यक्रमासाठी सहकार्य केले.

# श्री.रोकडेश्वर यात्रा महोत्सव रातोळी येथे लोककला व लावणी महोत्सव उत्साहात संपन्न

## लोकसंस्कृती, श्रद्धा व सामाजिक ऐक्याचा त्रिवेणी संगम

दैनिक वादळ वार्ता
**नायगाव । हानुमंत चंदनकर**




नायगाव तालुक्यातील ऐतिहासिक व पावनभूमी असलेल्या मन्याड नदी काठावरील मौजे – रातोळी येथील १६६ वर्षाची परंपरा असलेल्या श्री. रोकडेश्वर महाराज यात्रा महोत्सव निमित्त आयोजित करण्यात आलेला भव्य लोककला व लावणी महोत्सव मंगळवार दि. ३ फेब्रुवारी रोजी भक्तिमय, उत्साह आणि जल्लोषाच्या वातावरणात मोठ्या दिमाखात पार पडला. या महोत्सवाने संपूर्ण परिसर भक्तिमय व सांस्कृतिक आनंदाने भारावून गेला.यात्रेनिमित्त सकाळपासुनच मंदिर परिसरात भाविकाची गर्दी दिसून येत होती. श्री. रोकडेश्वर देवाच्या दर्शनासाठी पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. यात्रेनिमित्त अखंड हरीनाम सप्ताह, पालखी व मिरवणूक, नयनरम्य आतिषबाजी, गणगवळण, भारूड व जंगी कुस्त्याचा फड यासह विविध धार्मिक कार्यक्रम इत्यादी कार्यक्रम घेण्यात आले.यात्रेचे वैभव असलेला लोककला व लावणी महोत्सव सकाळी ११ वाजता सुरु करण्यात आला. या महोत्सवाने यात्रौत्सवाला सांस्कृतिक रंगत आणली. पारंपारिक लोककलेचे सादरीकरण, ठसकेबाज लावणी, पोवाडे, विविध लोकगीते सादर करण्यात आली. कलाकारांनी आपल्या दमदार अभिनय, नृत्याविष्कार व सादरीकरनातुन रसिक प्रेक्षकांची मने जिंकली. लावणीच्या तालावर संपूर्ण परिसर टाळ्यांच्या गजराने दुमदुमून गेला. महिला, युवक, युवती, ज्येष्ठ नागरिक तसेच लहान मुलांनीही मोठ्या उत्साहाने कार्यक्रमाचा आनंद घेतला. या सांस्कृतीक पर्वाला रातोळी गावासह परिसरातील अनेक गावातील नागरिकांची उपस्थिती होती. यात्रौत्सवामुळे गावात आनंद, उत्साह व चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते. धार्मिक श्रद्धेसोबतच लोकसंस्कृतीचे जतन आणि सामाजिक सलोखा जोपासण्याचे कार्य या महोत्सवातून घडल्याची भावना उपस्थित भाविकांनी व्यक्त केली. लोककला व लावणी महोत्सवात विजयी कलाकाराना ट्रॉफी, प्रणामपत्र व विशेष पारीतोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. यात्रा कमिटी रातोळी व समस्त गावकरी मंडळी रातोळी यांच्या पुढाकारातून व सहकार्यातून यात्रा महोत्सव यशस्वीरित्या संपन्न झाला.

# शिर्डीत माणुसकीचे दर्शन: हरवलेल्या अंध व्यक्तीला पत्रकार संजय महाजन यांनी मिळवून दिले आप्तेष्ट; साईभक्तांकडून कौतुकाचा वर्षाव

## तो' एकटाच पडला होता, पण माणुसकी धावून आली! साईप्रसादालयात हरवलेल्या अंध वारकऱ्याला संजय महाजन यांनी दिला आधार

दैनिक वादळ वार्ता
**नगर । प्रतिनिधी**



साईबाबांच्या पावन नगरीत दररोज लाखो भाविक दर्शनासाठी येतात, आणि इथे घडणारे सेवेचे प्रसंग नेहमीच मनाला स्पर्श करतात. आज शिर्डीत असाच एक माणुसकीचे दर्शन घडवणारा प्रसंग समोर आला, जिथे पत्रकार संजय महाजन यांनी तत्परता दाखवत एका हरवलेल्या अंध भक्ताला त्याच्या सहकाऱ्यांपर्यंत सुखरूप पोहोचवले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, शिर्डीमध्ये साईबाबांच्या दर्शनासाठी अनेक पालख्या दाखल होत असतात. अशाच एका पालखी सोहळ्यासोबत आलेला एक अंध भक्त साईबाबा प्रसादालय येथे महाप्रसाद घेण्यासाठी गेला होता. प्रसादाची पंगत संपल्यानंतर बाहेर पडताना प्रचंड गर्दीमध्ये त्याचा आपल्या सोबतच्या लोकांशी संपर्क तुटला. डोळ्यांनी दिसत नसल्यामुळे आणि आजूबाजूला अनोळखी आवाज असल्यामुळे तो भक्त अतिशय भांबावलेला आणि हतबल झाला होता. आपल्या सोबत्यांना कसे शोधायचे, या विवंचनेत तो प्रसादालय परिसरात चाचपडत होता.

नेमके याच वेळी, ज्येष्ठ पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्ते संजय महाजन हे तिथे उपस्थित होते. त्यांनी त्या अंध भक्ताची घालमेल ओळखली. क्षणाचाही विलंब न लावता महाजन यांनी माणुसकीचा हात पुढे केला. त्यांनी त्या अंध भक्ताची विचारपूस करून त्याला धीर दिला. केवळ विचारपूस करून न थांबता, महाजन यांनी त्या भक्ताचा हात धरून प्रसादालय परिसरात त्याच्या पालखीतील लोकांचा शोध सुरू केला.

बराच वेळ शोधाशोध केल्यानंतर अखेर त्या अंध भक्ताचे सहकारी आणि पालखीतील मंडळी सापडली. आपल्या माणसांना पुन्हा भेटल्यावर त्या अंध भक्ताच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि समाधान बघण्यासारखे होते. अनोळखी गर्दीत हरवलो असताना, एका पत्रकाराने मदतीचा हात देऊन आपल्या लोकांपर्यंत पोहोचवल्याबद्दल त्या भक्ताने अत्यंत भावुक होऊन संजय महाजन यांचे आभार मानले.साईबाबांच्या शिकवणुकीप्रमाणे 'सबका मालिक एक' आणि जनसेवा हीच ईश्वरसेवा मानून संजय महाजन यांनी केलेल्या या मदतीमुळे शिर्डीत सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे. आजच्या धावपळीच्या युगात माणुसकी अजूनही जिवंत आहे, याची प्रचिती या घटनेतून आली.

# रावेरमध्ये मानवतेचे दर्शन : मृत गायीवर विधीपूर्वक अंत्यसंस्कार



दैनिक वादळ वार्ता
**जळगाव । जितु इंगळे**

रावेर शहरातील अग्रेसर भवन परिसरात एका गायीचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात आली. ही बाब लक्षात येताच जागरूक नागरिकांनी तात्काळ सामाजिक कार्यकर्ते रवी भाऊ पाटील यांना याची माहिती दिली.

माहिती मिळताच रवी भाऊ पाटील यांनी आपल्या सहकाऱ्यांसह तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी वेळ न दवडता हिंदू संस्कृतीनुसार विधीपूर्वक त्या गायीवर अंत्यसंस्कार करून समाजासमोर मानवतेचा आदर्श ठेवला.या कार्यात पै. रवी भाऊ पाटील, नितीन भाऊ ठेकेदार, प्रमोद महाजन, बंडू पाटील, बंटी चौधरी, भैय्या महाजन, योगेश महाजन, सनी महाजन, चेतन पाटील, भैय्या शंकर, अक्षय महाजन, गौरव महाजन, सोनू पारले, तुषार महाजन, आऊ जाधव यांच्यासह अनेक कार्यकर्ते व नागरिक सहभागी झाले होते.

# शिवा संघटनेचे सोनखेड सर्कल प्रमुख व युवा उद्योजक संगमेश्वर उर्फ बंडु चपटे यांचे अभिष्टचिंतन

दैनिक वादळ वार्ता
**लोहा । राजकुमार पिल्लोळे**




सामाजिक व धार्मिक कार्यात सदा अग्रेसर असणारे तसेच शिवा संघटनेचे सोनखेड सर्कल प्रमुख व शेवडी (बा) चे ग्राम पंचायत सदस्य तथा कपिलेश्वर हार्डवेअर आणि अंबुजा सिमेंटचे होलसेल व्यापारी श्री संगमेश्वर उर्फ बंडु चपटे व सचिन कोंडी यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा वाढदिवसानिमित्त माजी सरपंच कैलास धोंडे,सरपंच तथा कृषी उत्पन्न बाजार समिती चे संचालक बसवेश्वर धोंडे, पत्रकार राजकुमार पिल्लोळे, बालाजी मामा एकलारे,उमाकांत फुलझळके,दत्ता एकलारे,नागेश माचुंद्रे, सामाजिक कार्यकर्ते अरुण राईकवाडे,वैजनाथ चपटे,यांच्यासह मित्रमंडळी, नातेवाईक आदींनी शाल पुष्पहार घालून अभिष्टचिंतन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# आत्मा प्रशिक्षणात बोगसगिरी जि.कृषी अधिकाऱ्याना निवेदन

लोकनेता न्यूज नेटवर्क
**नायगाव । माधव बैलकवाड**

नायगाव उमरी धर्माबाद तालुक्यात आत्मा एटीएमए योजनेअंतर्गत राबविण्यात येत असलेल्या कृषी प्रशिक्षणांमध्ये मोठ्या प्रमाणात बोगसगिरी व गैरव्यवहार सुरू असल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते मधुकर दत्ता जवळे नायगावकर यांनी केला आहे. या प्रकरणी त्यांनी जिल्हा कृषी अधिकारी यांच्याकडे लेखी निवेदन सादर करून तात्काळ सखोल विभागीय चौकशीची मागणी केली आहे.निवेदनात नमूद करण्यात आले आहे की,शेतकऱ्यांसाठी दाखविण्यात येणारी प्रशिक्षण शिबिरे कागदोपत्रीच पार पडल्याचे दाखवले जात असून प्रत्यक्षात अनेक ठिकाणी प्रशिक्षणच झालेले नाही,तरीही लाखो रुपयांचा निधी खर्च झाल्याची नोंद करण्यात आली आहे.काही प्रशिक्षणांमध्ये हजेरी पत्रकावर बनावट सह्या,एकाच व्यक्तींची वारंवार नावे,तसेच लाभार्थी शेतकरी नसतानाही प्रशिक्षण पूर्ण झाल्याचा बनाव करण्यात आल्याचा आरोप आहे.योजनेचा उद्देश शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देणे असताना, अधिकारी व संबंधित यंत्रणांच्या संगनमताने शासन निधीची उघड लूट सुरू आहे का? असा संतप्त सवालही निवेदनातून उपस्थित करण्यात आला आहे. या कथित गैरव्यवहारामुळे खऱ्या शेतकऱ्यांना प्रशिक्षणापासून वंचित राहावे लागत असून शासनाची प्रतिमा मलीन होत आहे, असेही नमूद करण्यात आले आहे.या प्रकरणाची निष्पक्ष विभागीय चौकशी करून दोषी अधिकारी, कर्मचारी व प्रशिक्षण आयोजकांवर कठोर कारवाई करावी, तसेच गैरमार्गे वापरलेला निधी वसूल करावा, अशी ठाम मागणी मधुकर जवळे यांनी केली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077